महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education

नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर -440 001

e-mail :-msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

परीक्षा प्राधान्य / महत्वाचे

पत्र क्रं.नाविम गो उ.मा / प्रात्य / 80
नागपुर दि. 02 / 01 / 2024
08

प्रति,
मुख्यध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा /
कनिष्ठ महाविद्यालये
नागपुर विभागीय मंडळ, नागपुर

विषय-- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी–मार्च 2024 च्या प्रात्यक्षिक ,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्याबाबत ,तसेच इयत्ता 10 वी व 12 वी "आऊट ऑफ टर्न "ने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा बाबत.

संदर्भ:– 01) रा.म. / परीक्षा–6 / 4853–पुणे दि. 01 / 11 / 2023
02) रा.म. / परीक्षा–2 / 5508 पुणे 04 दि. 26 / 12 / 2023

उपरोक्त संदर्भिय पत्र.क.1 अन्वये प्रात्याक्षिक ,श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा कालावधीचे अंतिम वेळापत्रके राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. त्यानुसार खालील कालावधीत प्रात्यक्षिक ,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा खालील प्रमाणे आयोजित कराव्यात .

| अ.क. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) | परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 01 | प्रात्यक्षिक ,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा,**NSQF** अंतर्गत व्यावसायिक अभ्यासकम विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा, माहिती तंत्रज्ञान सामान्य ज्ञान विषयांची परीक्षा | शुक्रवार दि. 02 फेब्रुवारी, 2024 ते मंगळवार दि. 20 फेब्रुवारी 2024 |

संदर्भिय पत्र क. 2 च्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की.माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च 2024 परीक्षेपासुन गणकयंत्र विभागामार्फत सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना **ONLINE** पध्दतीने प्रात्याक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुण **LOGIN** मधुन भरण्याची सुविधा देण्यात येणार आहे.

सदर डाटा केंद्रनिहाय उपलब्ध करून दिला जाणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी फेब्रुवारी–मार्च 2024 च्या परीक्षांपासुन "आऊट ऑफ टर्न "ने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी आयोजित कराव्यात.

जुलै–ऑगस्ट पुरवणी परीक्षेसाठी 10 वी व 12 वी ची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतिनुसार केंद्रावर घेतली जाते. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येऊन इयत्ता 10 वी व 12 वी ची प्रात्यक्षिक परीक्षा देखील संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घेण्यात यावी.

तरी फेब्रुवारी–मार्च 2024 च्या परीक्षेपासुन "आऊट ऑफ टर्न "ने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षांबाबत तसेच जुलै–ऑगस्ट 10 वी व 12 वी पुरवणी परीक्षेतील प्रात्यक्षिक परीक्षेच्या आयोजनाबाबत मुख्यध्यापक / प्राचार्य उपरोक्त प्रमाणे केलेल्या बदलाची नोंद घ्यावी .

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.